Shri. Hemantrao Jamkar, President | Adv. Kiran Subhedar, Vice-President | Shri. Vijayrao Jamkar, Secretary | Dr. Vasant K. Bhosle, Principal

4th Cycle Self Study Report

## Criterion VI

## E-Governance Policy

1. Late Sow. Kamaltai Jamkar Mahila Mahavidyalaya, Parbhani will ensure that it adopts e-governance in most of the aspects of functioning like academic, administrative, finance, library and other support services. All the stakeholder oriented and encouraged to adopt e- governance. The scope of the policy is as follows-

   **Scope**

- Academic
- Administration
- Finance and Accounts
- Student Admission and Support
- Examinations
- Library

2. **Objectives**

1. To discuss various issues regarding demands of academic and infrastructural facilities
2. To try to create paperless environment in the institution
3. To create transparency in all functioning of the college
4. To provide easy and quick access to information through dynamic website
5. To make college campus Wi- Fi enabled and upgrade ICT facilities and internet connectivity.
6. To discuss about maintenance and upgradation of IT facilities
7. To undertake automation of the library
8. Functioning of the institution for e-governance is as follows-

Shri. Hemantrao Jamkar President | Adv. Kiran Subhedar Vice-President | Shri. Vijayrao Jamkar Secretary | Dr. Vasant K. Bhosle Principal



9. Use of ICT techniques for teaching faculty for effective teaching.
10. Classrooms equipped with ICT enabled infrastructure. Use of platforms like ZOOM, Google meet, etc. for online teaching – learning purpose. Group SMS facility to send notices, WhatsApp groups of students with teacher as Admin for sending messages, video links, pdf notes etc.
11. Training to teachers to use platforms like google form for conducting assignments, tests, feedbacks etc.
12. Provided access of syllabus to students from website
13. The institution adopts IUMS of affiliating University and CMS. Admission process is completed through this two software. After admission, eligibility forms are generated, filled and submitted to university. For Preparation of income and expenditure budget, maintenance of cashbook, ledger etc. used ERP Tally software.
14. To develop and implement computerized systems for the appropriate gathering, archiving, and upkeep of pertinent student, faculty, test, result, and scholarship data in the necessary forms.
15. Online payment will be used to collect student fees.
16. Marks of the Skill Enhancement Course (SEC), External Marks, and Continuous Internal Evaluation (CIE) must be processed online.
17. Results is made available online
18. OPAC system is made available for search of books in the library
19. The website is fully used as a crucial information source for all parties involved, and crucial messages and circular notices are posted there to guarantee that the underprivileged can access information at any time and from any location.

Shri. Hemantrao Jamkar President | Adv. Kiran Subhedar Vice-President | Shri. Vijayrao Jamkar Secretary | Dr. Vasant K. Bhosle Principal



**20.** Use of biometric machines to record attendance of faculty, non-teaching staff

**21.** Display of advertisement, admission schedule, display of rules and regulations of college and university, etc.

IQAC Coordinator
Late Sow. Kamaltai Jamkar
Mahila Mahavidyalaya,
Parbhani

Late Sow. Kamaltai Jamkar Mahila Mahavidyalaya Parbhani-431401

Principal
Late Sow. Kamaltai Jamkar
Mahila Mahavidyalaya, Parbhani

नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था परभणी संचलित

# कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी

## महाविद्यालय विकास समिती बैठक

## कार्यवाही अहवाल व इतिवृत्त

---

**१) मागील बैठकीचे इतिवृत्त वाचुन कायम करणे:-**

सर्व सदस्यांसमोर मा.अध्यक्षांच्या परवानगीने दि. १९ मार्च २०१९ च्या बैठकीतील कार्यवाही बाबतचे इतिवृत्त वाचन करण्यात आले व सर्वांनुमते मान्य केले.

**२) मागील बैठकीच्या कार्यपूर्ती अहवालास मान्यता देणे:-**

मागील बैठकीत संमत झालेल्या ठरावानुसार जी कार्यवाही झाली त्याचे सर्व सदस्यांसमोर वाचन करण्यात आले व सर्वांनुमते त्यास मान्यता देण्यात आली.

**३) नॅक संदर्भात कार्यवाही चर्चा व निर्णय:-**

महाविद्यालयाचे नॅक झाले त्यानंतर पहिला AQAR अहवाल नियमानुसार विहित कालावधीच्या मर्यादीत मुदतीत नॅक कार्यालयास पाठविण्यात यावा असा ठराव संमत झाला. त्यानुसार विहित मुदतीत AQAR अहवाल नॅक कार्यालय, बेंगलुर यांना पाठविण्यात आला व कार्यवाही पूर्ण करण्यात आली.

**४) बी.व्होक.अभ्यासक्रमाच्या विस्ताराबाबात:-**

महाविद्यालयात सन २०१४-१५ पासुन आजतागायत बी.व्होक.अभ्यासक्रम चालतो. २०१७ पर्यंत शासकिय अनुदान मिळत होते त्यानंतर **स्वंयम अर्थपुरवठा** या तत्वावर पुढे चालु ठेवण्यात आला. त्याचा विस्तार करण्याबाबत चर्चा करण्यात आली व त्यातील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु व्हावा व त्याव्यतिरीक्त नविन अभ्यासक्रमाचे प्रस्ताव पाठवावेत असे ठरले.

ठरावानुसार UGC कडे २०१८-१९ पासुन Retail Marketing Management, Diploma in Bakery, Diploma in Beautification आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम M.Voc. चे प्रस्ताव UGC कडे मान्यतेसाठी पाठवीले. कार्यवाही पूर्ण करण्यात आली.

**५) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पदमान्यतेबाबत चर्चा:-**

शासनाने २०१७ च्या विद्यार्थी संख्येनुसार केवळ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पदमान्यता करुन दिलेली आहे. मात्र भरती प्रक्रियेस स्थगिती आहे. त्यानुसार शिक्षकेत्तर कर्मचारी यांत एक- अधिक्षक व एक - कनिष्ठ लिपीक हे अतिरीक्त पद मान्य आहे. शिक्षक पद निर्मितीत केवळ संगीत अभ्यासक्रमात एक जागा अतिरीक्त मान्यता आहे. परंतु भरतीस मान्यता अद्याप प्राप्त नाही. या व्यतिरीक्त ४ शिक्षक निवृत्त झाल्याने त्या जागा रिक्त झालेल्या आहेत पण भरती बंद आहे. चर्चेबाबतची कार्यवाही पूर्ण झाली.

**६) सांस्कृतीक सभागृह बांधकामाबाबत चर्चा व निर्णय:-**

वरील विषया संदर्भाने अभियंता यांना पाचारण करुन बांधकामाबाबतची अंदाजीत किमत विचारणा केली. जवळपास १५ लाख रु. बांधकामास लागतील असे त्यांनी सांगितले. सद्य स्थितीत महाविद्यालयाची आर्थिक स्थिती नसल्याने सध्या बांधकाम स्थगित ठेवण्यात आले असून कार्यवाही चालू आहे.

नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित,

कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी

# महाविद्यालय विकास समिती बैठक

# कार्यवाही अहवाल व इतिवृत्त

---

**१. मागील बैठकीचे इतिवृत्त व कार्यवाही अहवाल वाचून कायम करणे:**

सर्व सदस्यांसमोर मा.अध्यक्षांच्या परवानगीने दि. ०९ ऑगस्ट २०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व कार्यवाही बाबतचे वाचन करण्यात आले व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**२. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चा प्राचार्यांनी केलेल्या कार्याचा आढावा:**

प्रस्तुत बैठकीत प्राचार्यांनी शै.वर्ष २०१८-१९ मध्ये केलेल्या कार्यांचा आढावा देऊन कार्य अहवालाचे वाचन केले. सर्व सदस्यांनी कार्य अहवालावर समाधान व्यक्त केले व कार्य अहवाल मान्य करण्यात आला.

**३. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील विविध अभ्यासक्रमास झालेल्या प्रवेशाचे तपशिलवार चर्चा व मान्यता देणे:**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील विविध अभ्यासक्रमास प्रवेशित झालेल्या संख्येवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मा. सचिव श्री विजयराव जामकर यांनी ज्या अभ्यासक्रमास विद्यार्थी संख्या कमी प्रवेशित आहे त्या अभ्यासक्रमाची विद्यार्थी संख्या वाढविण्याचे निर्देश दिले. निर्देशाप्रमाणे कार्यवाही पूर्ण झाली.

**४. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चा विषयनिहाय व तृतीय वर्षाच्या निकालाचे तपशिल, चर्चा व मान्यता:**

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रम विषयनिहाय व वर्गनिहाय निकालांचे तपशिल बैठकीसमोर ठेऊन त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली व ज्या विषयाचे निकाल कमी आहेत ते वाढविण्याचे निर्देश देण्यात आले. त्याच बरोबर काही सदस्यांनी विद्यापीठ गुणवत्ता यादीत विद्यार्थी येण्यासाठी प्रयत्न व्हावेत अशा सुचना केल्या व त्याची प्रतिपुर्ती म्हणून B.Voc. च्या तीन विद्यार्थीनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये गुणवत्ता यादीत आल्या.

**५. शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता सुरु करावयाच्या विविध अभ्यासक्रमास मान्यता देणे (एम.कॉम., GST, लेखनकौशल्य, बेकरी उत्पादन, Beautification):**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये एम.कॉम.प्रथम वर्ष, GST, लेखनकौशल्य, बेकरी उत्पादन व सौंदर्य प्रसाधन अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र कोर्स सुरु करण्यात आले व त्यास विद्यापीठाचीही मान्यता घेण्यात आली व मान्य ठरावानुसार प्रस्तुत अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेले आहेत.

**६. CASI आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्था, मुंबई यांच्या सोबत झालेल्या शैक्षणिक करारास कार्योत्तर मान्यता देणे:**

महाविद्यालयाचे शैक्षणिक क्षेत्र विस्तारण्यासाठी मुंबई येथील CASI आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्था, मुंबई यांच्या सोबत शैक्षणिक करार करुन ती शैक्षणिक संस्था व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य विकास व प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याचे ठरले व त्यास मान्यता देण्यात आली, व प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु झालेले आहेत.

७. **शैक्षणिक वर्ष २०१९-२० चा अर्थसंकल्प चर्चा व मान्य करणे:**

प्रतिवर्ष प्रमाणे शै.वर्ष २०१९-२० या वर्षाच्या सुरुवातीला महाविद्यालयात निर्माण होणारे व येणारे उत्पन्नाचे स्त्रोत व महाविद्यालयाचा होणारा अंदाजित खर्च उत्पन्नाच्या आधारे आर्थिक योजना राबविणे साठी सर्व सदस्यांसमोर प्राचार्यांनी २०१९-२० चा महाविद्यालयाचा अर्थसंकल्प सादर केला व सर्वानुमते चर्चेअंती मान्य करण्यात आला. मान्य करण्यात आलेल्या अर्थसंकल्पानुसार कार्यवाही चालु आहे.

८. **प्राचार्य पदासाठीचा पुढील दोन वर्षापर्यंतच्या कालावधी वाढीची प्रक्रिया करणेस मान्यता प्रदान करणे:**

प्राचार्य डॉ.व्हि.के.भोसले यांची प्राचार्य पदाची ५ वर्षाची मुदत जुलै २०२० ला संपणार असल्याने पुढील ५ वर्षाचा कालावधी वाढवून मिळणेसाठीचा प्रस्ताव मांडण्यात आला.

प्रस्तुत प्रस्तावावर मा.सचिवांनी विचार-विनिमय करुन निर्णय दिला जाईल असे सुचित केले व तत्वत: मान्यता देण्यात आली व मा. अध्यक्षांच्या परवानगीने वाढीव कालावधी देण्यात येईल असे ठरले त्यानुसार मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्राचार्यपदाच्या कालावधी वाढीचा प्रस्ताव विद्यापीटास पाठविण्यात आला. विद्यापीठाने समिती गठीत करुन समितीने सकारात्मक शिफारस केली व समितीने वाढीव कालावधीस मान्यता दिली. त्यानुसार विद्यापीठ कार्यवाही सुरु आहे.

९. **IUT आंतरविद्यापीठीय स्पर्धेच्या आयोजनाबाबतचा प्रस्ताव विद्यापीठास पाठविण्यास मान्यता प्रदान करणे:**

शै.वर्ष २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय पश्चिम विभागीय (पुरुष) तसेच आखिल भारतीय (पुरुष) बॅडमिंटन स्पर्धा आयोजनाबाबतचा प्रस्ताव विद्यापीठास पाठवायचा होता. असा प्रस्ताव पाठविण्यासंबधीचा ठराव बैठकीत मांडण्यात आला. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. पाठविलेल्या प्रस्तावाप्रमाणे विद्यापीठाने आयोजनाची मान्यता दिली. व त्यानुसार ०१ जानेवारी ते १० जानेवारी २०२० या कालावधीत स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यवाही पूर्ण झाली.

१०. **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चा AQAR रिपोर्ट NAAC कार्यालयास पाठविण्यास बाबत:**

शै. वर्ष २०१८-१९ चा AQAR रिपोर्ट NAAC कार्यालयास पाठविण्याबाबतचा प्रस्ताव प्रा.लोहकरे ओ.ए. यांनी मांडला त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. AQAR रिपोर्ट ३१ डिसेंबर २०१९ च्या आत पाठविण्याची मर्यादा होती. प्रस्तुत मर्यादेच्या आत AQAR रिपोर्ट NAAC बैंगलोर या कार्यालयाकडे पाठविण्यात आला. कार्यपूर्तता झाली.

११. **विद्यापीठ कायद्यानुसार विद्यार्थी निवडणुक कार्यक्रम राबविण्यास मान्यता:**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा - २०१६ च्या कायद्यातील तरतुदीनुसार व शासनाच्या निर्णयानुसार शै.वर्ष २०१९-२० मध्ये विद्यार्थी निवडणुक कार्यक्रम राबविणे बाबतचा प्रस्ताव प्रो.डॉ.के.के.पाटील यांनी मांडला. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. विद्यार्थी संसद निवडणुक घेण्याचे प्रथम निर्देश देण्यात आले होते व त्यानंतर विद्यापीठाकडुन निवडणुका घेण्यासाठी स्थगिती देण्यात आली. त्यामुळे निवडणुका घेण्यात आल्या नाहीत. विद्यापीठ निर्णयाप्रमाणे कार्यवाही पूर्ण झाली.

१२. **ग्रंथालय ईमारतीच्या विस्तारीकरण करण्यास चर्चा व मान्यता प्रदान करणे:**

वाढती विद्यार्थी संख्या व वाढीव पुस्तकांची संख्या लक्षात घेता अस्तित्वात असलेली ग्रंथालय ईमारत अपुरी पडत असल्याने प्रस्तुत ईमारतीचा विस्तार करणेसाठीचा प्रस्ताव श्री व्हि.डी.चिंतलवार यांनी मांडला. त्यावर विचारविनिमय करुन जसजसा निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे विस्तारीकरण करावे, असे ठरले.

महाविद्यालयाच्या ग्रंथालय ईमारतीचे अंदाजित नियोजन करण्यात आले व त्यानुसार मार्च - २०२० पासुन हळूहळू विस्तारीकरणाचे कार्य सुरु करण्यात येणार आहे. कार्यवाही चालु आहे.

**१३. शै.वर्ष २०१८-१९ चा महाविद्यालयाच्या अंकेक्षण अहवालास कार्योत्तर मान्यता प्रदान करणे:**

शै.वर्ष २०१८-१९ चा महाविद्यालयाच्या लेखा अंकेक्षण अहवालास मान्यता प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव प्रा.एन.एल.जाधव यांनी मांडला. त्यास सर्वांनुमते मान्यता देण्यात आली. कार्यवाही पूर्ण झाली.

**१४. महाविद्यालय विकास समितीवरील सदस्यांच्या बदलास कार्योत्तर मान्यता प्रदान करणे:**

महाविद्यालय विकास समितीवरील सदस्य संख्या कमी झाल्याने व नविन सदस्य घेणेबाबतचा प्रस्ताव प्राचार्य डॉ.वसंत भोसले यांनी मांडला व सर्व सदस्यांनी विचार विनिमय करुन नवीन सदस्य घेणेबाबतचा संपुर्ण अधिकार मा.अध्यक्षांकडे सोपविण्यात आला. मा अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार महाविद्यालय विकास समितीच्या नाम निर्देशन मा.अध्यक्षांच्या परवानगीने बदल करण्यात आले. ठरावाप्रमाणे कार्यवाही पूर्ण झाली.

**१५. शै.वर्ष २०२० - २१ साठी नविन विषय व कोर्सेससाठी विद्यापीठ व शासनास पाठविण्यासाठीच्या प्रस्तावाबाबत चर्चा व निर्णय घेणे :**

शै.वर्ष २०२०-२१ करिता महाविद्यालयात नवीन पदव्युत्तर तीन अभ्यासक्रम सुरु करणेबाबतचा प्रस्ताव प्रा.डॉ.संगिता आवचार यांनी मांडला त्यावर चर्चा होऊन एम.ए.(समाजशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास) असे तीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी विद्यापीठ व शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश देण्यात आले. प्रस्तुत ठरावावर कार्यवाही करणेसाठी सप्टेंबर - २०२० मध्ये प्रस्ताव पाठविण्यात येतील. कार्यवाही चालु आहे.

**१६. 'विद्यार्थी व शिक्षक कल्याण योजना' लेखा (Bank Account)उघडण्यास कार्योत्तर मान्यता प्रदान करणे:**

महाविद्यालयात विद्यार्थी व शिक्षक कल्याण योजना असावी व त्या योजनेअंतर्गत विद्यार्थी व शिक्षक यांना लाभ देण्यात यावा असा प्रस्ताव प्रा.एन.एल.जाधव यांनी मांडला. त्यानुसार महाविद्यालयाने 'विद्यार्थी व शिक्षक कल्याण योजना' असे प्राध्यापक समन्वयक व प्राचार्य यांच्या संयुक्त नावाने स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये लेखा / बँक खाते उघडण्यात आले. त्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव प्रा.पडघन ए.बी. यांनी मांडला व सर्वांनुमते त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. ठरावाप्रमाणे कार्यवाही पूर्ण झाली.

**१७. वसतीगृहाच्या प्रवेश व सुरक्षेबाबतची चर्चा व निर्णय:**

महाविद्यालयाचे मुलींचे वसतीगृह प्रवेश व सुरक्षा या विषयी चर्चा करण्यात आली. व सुरक्षेविषयी अतिरीक्त सुरक्षा रक्षक देण्याचे निर्देश दिले तसेच वसतीगृह पाहणीसाठी सक्षम महिला देणेसाठीची जाहिरात प्रसिध्द करावी व त्यातुन योग्य महिलेस वसतीगृह पाहणीसाठी देण्यात यावे असे मा.अध्यक्षांनी निर्देश दिले होते. त्यानुसार येत्या जुन मध्ये जाहिरात देऊन पदभरती करण्यात येईल. कार्यवाही चालु आहे.

**१८. मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय:**

मा.अध्यक्षांच्या परवानगीने दयावयाचे विषय नसल्याने व नियमित विषय पत्रिका संपल्याने बैठक मा.अध्यक्षांच्या परवानगीने समाप्त करण्यात आली.

प्राचार्य
कै.सौ.क.जा.महिला महाविद्यालय
परभणी

नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित,

के.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी

## महाविद्यालय विकास समिती बैठक

## कार्यवाही अहवाल व इतिवृत्त

**विषय क्र.१.:- मागील बैठकीचे इतिवृत्त व कार्यवाही अहवाल वाचून कायम करणे:**

सर्व सदस्यांसमोर मा.अध्यक्षांच्या परवानगीने दि.०७ नोव्हेंबर २०२० रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व कार्यवाही अहवालाचे वाचन करण्यात आले व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

मागील बैठकीतील इतिवृत्त वाचन करुन त्यावर चर्चा होऊन मागील सर्व इतिवृत्त मान्य करण्यात आले. कार्यवाही पूर्ण झाली.

**विषय क्र.२.:- शै. वर्ष २०२०-२१ कोव्हीड - १९ (कोरोना) मुळे विलंबाने सुरु झाल्याने महाविद्यालयाची विविध अभ्यासक्रमासाठीची प्रवेश प्रक्रीया विषयी चर्चा व मान्यता :**

नोव्हेंबर २०२० मध्ये विविध अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रीया अत्यंत मंद गतीने सुरु होती कारण कोव्हीड - १९ मुळे बहुतांश ठिकाणी Lockdown सुरु होते. त्यानंतर विद्यापीठाने प्रवेश कालावधी वाढवुन दिल्यामुळे दि. ३१ डिसेंबर २०२० पर्यंत महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या **८६१** इतकी झाली जे की मागील शैक्षणिक वर्षाच्या तुलनेत वाढलेली दिसते. तथापी संगीत, उर्दू या अनुदानित विभागाच्या विद्यार्थी संख्या दिवसें दिवस कमी होतांना दिसतात. या ठिकाणी विभागाच्या प्राध्यापकांनी संख्या वाढीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच विनाअनुदानित एम.ए. (संगीत) व एम.एस्सी.(C.S.) या विभागाची संख्या अत्यल्प असल्यामुळे प्रशासनावर अतिरीक्त आर्थिक बोजा पडत आहे. एम.ए.(संगीत) या अभ्यासक्रमास केवळ २ ते ४ विद्यार्थी असल्याने व नाममात्र शुल्क आकारत असल्याने त्या विभागाचे संलग्निकरण चालू ठेवण्याबाबत विचार करावा लागेल. तसेच संगीत विभागाने जाणीव पूर्वक प्रयत्न करुन संख्या वाढवली पाहिजे. या विषयीची चर्चा मागील बैठकीत करण्यात आली.

मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.३.:- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठीचा अर्थसंकल्प मंजुरीबाबत.:-**

शै. वर्ष २०२०-२१ साठीचा आर्थिक अर्थ संकल्प सादर करण्यात आला त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

कार्यवाही पूर्ण झाली.

**विषय क्र.४.:-विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजुर केलेले विविध अभ्यासक्रम सुरु करणे बाबत चर्चा:**

शै. वर्ष २०१९-२० मध्ये B.Voc. विद्याशाखे अंतर्गत एकुण ५ अभ्यासक्रमाचे प्रस्ताव UGC, नवी दिल्ली येथे पाठवण्यात आले होते. ज्यामध्ये एक पदव्युत्तर अभ्यासक्रम, दोन पदवी अभ्यासक्रम व दोन प्रमाणपत्र अभ्यासक्रम असे एकुण पाचही अभ्यासक्रम UGC ने मान्य केले. त्यानंतर पुढील प्रक्रीया करणेसाठी विद्यापीठाकडे मान्य प्रस्ताव प्रश्नांकित करण्यात आले. विद्यापीठाच्या समितीने पाहणी करुन सकारात्मक अहवाल दिला. त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या परवानगीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आले व त्यासही शासनाची मान्यता प्राप्त झाली. तद्नंतर सहसंचालक कार्यालय,नांदेड यांचे नाहरकत प्रमाणपत्र येणै बाकी आहे. त्यानंतर विद्यापीठाकडे संलग्निकरण शुल्क भरावे लागेल. करिता, मान्यतेस्तव सादर.

विषय क्र.५:-रुसा (RUSA) अंतर्गत मान्य झालेले आर्थिक अनुदान याबाबत चर्चा:

महाराष्ट्र RUSA अंतर्गत महाविद्यालयास १ कोटी रुपयांचा विकासात्मक निधी मान्य झालेला आहे.

करिता, माहितीस्तव सादर करण्यात आला.

**विषय क्र.६.:-प्राध्यापकांचा कार्य आढावा घेण बाबत:**

मा.अध्यक्ष, नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था यांच्या समोर प्रत्येक विभागाच्या प्रमुखांना सभेच्या बैठकीत बोलावून त्यांच्या कार्याचा व विकासात्मक योजनेचा आढावा घेण्यात आला.

कार्यवाही पूर्ण झाली.

**विषय क्र.७:-नॅक संदर्भात प्राध्यापकांचा Criterion wise कार्य आढावा सभागृहात सादर करणे बाबत.**

मा.अध्यक्ष व मा. सचिवांनी सूचित केल्याप्रमाणे प्रत्येक Criterion प्रमाणे कार्य करणारे प्राध्यापक यांच्याकडून AQAR लिहून घेण्यात आला. त्याचे सर्व प्राध्यापकांसमोर सामूहीक वाचन करण्यात आले व त्यात प्राचार्यांनी काही सुचना व दुरुस्त्या करण्यास सांगितले. तसेच, प्रत्येक समिती व विभागप्रमुखांना आपआपल्या विभागाची व समितीची किमान एक किंवा त्यापेक्षा जास्त उत्कृष्ट बाब लिहून आणण्यास सांगितली असता ४ ते ५ प्राध्यापकांनी अत्यंत निकृष्ट, निष्काळजी, गांभीर्य न ठेवता फाटक्या तुटक्या कागदावर लिहून दिले. जी बाब अत्यंत चुकीची व बेपर्वाहीची होती. यावर त्यांना खुलासे करण्यासाठी पत्रेही देण्यात आली व तसेच मा. सचिवांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन समज दिली व प्रत्येकाला आपले म्हणणे लेखी मांडण्यास सांगितले व त्यांनी लेखी स्वरुपात आपले म्हणणे मांडलेले आहे व NAAC चा AQAR जानेवारी - 2020 मध्ये यशस्वीपणे पाठविण्यात आला.

माहितीस्तव सादर.

**विषय क्र.८:-वसतिगृह व उपहार गृह सुरु करणे विषयी व त्यांच्या उत्पन्नाविषयी चर्चा करणे बाबत:**

महाविद्यालयामध्ये वसतिगृह व उपहारगृह COVID -19 च्या परिस्थीतीमुळे व मा. जिल्हाधिका-यांच्या सुचनेवरुन बंद करण्यात आले होते. जेंव्हा Lockdown ची परिस्थीती शिथील झाली तेंव्हापासून वसतिगृह व उपहारगृह सुरु करण्यात आले. बंद झालेले उत्पन्न अल्पशा प्रमाणात सुरु झालेले आहे. आजतागायत ३० विद्यार्थीनी वसतिगृहात निवासासाठी आहेत व उपहारगृहाचे उत्पन्न सुध्दा दरमहा रु. 5000/- वरुन रु. 3000/- करण्यात आले आहे.

COVID - 19 परिस्थीती पाहता माहिती तथा मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.९:-श्री अमरसिंग ठाकुर यांच्या निवासा संदर्भाने निर्णय घेणे बाबत.**

महाविद्यालयाचा माजी कर्मचारी अमरसिंग ठाकूर यांच्या कुटूंबीयाना वारंवार निवास सोडण्याची सुचना देऊनही ते अजून वास्तव्यास आहेत. याबाबत मार्गदर्शन तथा सुचना व्हाव्यात.

माहिती तथा मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.१०:- मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय:**

मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचा विषय नसल्याकारणाने चर्चा झाली नाही व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त करण्यात आली.

बैठकीच्या शेवटी प्रा.एन.एल.जाधव यांनी सर्वांचे आभार मानले व सभा संपन्न झाली.

प्राचार्य
कै.सौ.क.जा.महिला महाविद्यालय
परभणी

नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित,

कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी

# महाविद्यालय विकास समिती बैठक

# कार्यवाही अहवाल व इतिवृत्त

**विषय क्र.१:- मागील बैठकीचे इतिवृत्त व कार्यवाही अहवाल वाचून कायम करणे :-**

सर्व सदस्यांसमोर मा.अध्यक्षांच्या परवानगीने दि.०१ जुलै २०२१ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व कार्यवाही अहवालाचे वाचन करण्यात आले व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

मागील बैठकीतील इतिवृत्त वाचन करुन त्यावर चर्चा होऊन मागील सर्व इतिवृत्त मान्य करण्यात आले. कार्यवाही पूर्ण झाली.

**विषय क्र.२:- UGC मान्य B.Voc. अभ्यासक्रमापैकी किती अभ्यासक्रम सुरु करावयाचे याबाबत चर्चा:-**

UGC मान्य एकुण ५ अभ्यासक्रमापैकी शै. वर्ष २०२१-२२ या वर्षात M.Voc. (Fashion Technology) हा एकमेव अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात येऊन अंमलबजावणी करण्यात आली.

**विषय क्र.३:- सन २०१९-२० मधील विविध अभ्यासक्रमांचे निकाल व शै. वर्ष २०२०-२१ ची अभ्यासक्रम निहाय विद्यार्थी संख्या:-**

शै. वर्ष २०१९-२० मधील विविध अभ्यासक्रमांचा वर्गनिहाय व विषयनिहाय परीक्षेचा निकाल बैठकीत सादर करण्यात आला व तो मान्य करण्यात आला. तथापि शै. वर्ष २०२०-२१ साठी कोव्हिड- १९ ची परिस्थिती असतांना विशेष प्रयत्न करुन विद्यार्थी संख्या वाढविण्याचे निर्देश मा. सचिवांनी दिल्याप्रमाणे विद्यार्थी संख्या वाढीसाठी प्रयत्न करण्यात आले.

मागील शै. वर्षाच्या तुलनेत १५% विद्यार्थी संख्येत वाढ झाली.

**विषय क्र.४:- शै.वर्ष २०२१-२२ करिता नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये गृहविज्ञान व शिक्षण शास्त्र (M.A. Home Science & M.A.Education) प्रस्ताव सादर करणे बाबत चर्चा व मान्यता:-**

शै. वर्ष २०२१-२२ या वर्षात शै. वर्ष २०२२-२३ पासून एम.ए. गृहविज्ञान व एम.ए. शिक्षणशास्त्र हे दोन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याविषयीचा निर्णय मान्य करण्यात आला. परंतु, काही तांत्रिक कारणास्तव शै. वर्ष २०२२-२३ मध्ये उपरोक्त अभ्यासक्रम सुरु करता आले नाही.

**विषय क्र.५:- नवीन अभ्यासक्रमासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करणे बाबत:-**

शै. वर्ष २०२०-२१ पासुन नवीन अभ्यासक्रम सुरु झाल्याने अस्तित्वात असलेली पायाभुत सुविधा (वर्गखोल्या) या कमी पडत असल्याने त्यात वाढ करणेसाठी बांधकाम करणे आवश्यक होते. तथापि मा. सचिवांच्या सुचनेनुसार तात्पुरत्या स्वरुपात वरील कार्य स्थगीत ठेवण्यात आले आहे.

**विषय क्र.६:- पदभरती संदर्भात चर्चा:-**

शै. वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ करिता शासनाने विविध पदभरती साठीचे परिपत्रक जारी केले असले तरी ते शै. वर्ष २०१७-१८ च्या विद्यार्थी संख्येच्या आधारावर पद मान्य करण्याचे निश्चित केल्याने त्या काळात महाविद्यालयात ८०% जागा भरल्या असल्या कारणाने महाविद्यालयात एकही पद भरण्यास मान्यता देण्यात आली नाही. करिता, पदभरती झालेली नाही.

तथापि दोन प्रशासकिय कर्मचा-यांना बढती देऊन रिक्त पदे भरण्यात आली.

विषय क्र.७:- शै.वर्ष २०२०-२१ मध्ये नेमणुक केलेल्या तासिका तत्वावरील सहाय्यक प्राध्यापकांच्या मानधनाबाबत :-

शै. वर्ष २०२०-२१ मध्ये ज्या अनुदानित व विनाअनुदानित तत्वावर अपात्र व पात्र तासिका तत्वावर भरती केलेल्या शै.वर्ष २०१९-२० मध्ये जे प्राध्यापक कार्यरत होते त्यांचेच मानधन अद करण्यात आले. इतर नेमलेल्या प्राध्यापकांची देयके मान्य न केल्यामुळे त्यांना महाविद्यालय शुल्कातून मानधन अदा करण्यात आले.

**विषय क्र.८:- संगीत विषयाच्या ऑनलाईन आंतरराष्ट्रीय वेबीनारच्या आयोजनाबाबत:-**

शै.वर्ष २०२१-२२ मध्ये मा. कोषाध्यक्ष यांनी सुचित केल्याप्रमाणे संगीत विषया ऑनलाईन आंतरराष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले. त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला.

**विषय क्र.९:- M.Voc. (F.T.) या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शुल्क व प्राध्यापकांच्या मानधनाबाबत.**

शै. वर्ष २०२०-२१ मध्ये M.Voc. (F.T.) या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शुल्क निर्धारण नसल्यामुळे महाविद्यालयाने रु. १५०००/- प्रतिवर्ष शुल्क आकारण्याचे निश्चित केले व त्या अभ्यासक्रमास अध्यापन करणा-या प्राध्यापकांना अतिरीक्त रु. ३०००/- मानधन म्हणुन देण्याचे मान्य केले.

विषय क्र.१०:- **मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय:**

मा.अध्यक्षांच्या परवानगीने खालील ऐनवेळच्या विषयांवर चर्चा करण्यात येऊन मान्यता प्रद करण्यात आली.

१) मेहंदीचा प्रमाणपत्र कोर्स सुरु करण्याचा निर्णय घेण्यात येऊन अंमलबजावणी करण्यात आली.

२) महाविद्यालय स्तरावर प्रमाणपत्र कोर्स साठी स्वतंत्र अभ्यासमंडळ तयार करण्यात आले.

३) IQAC विभागाच्या अंतर्गत घेण्यात येणारे विविध शैक्षणिक लाभकरी (शिक्षक, व्यवस्थापन, विद्य व इतर) यांच्या महाविद्यालय, अभ्यासक्रम, प्रगती व इतर सोयी या बाबतच्या प्रतिक्रीया घेऊन त विश्लेषण व कार्यपुर्ती करण्यात आली त्यास मान्यता घेण्यात आली.

४) विद्यार्थी समाधान निरीक्षणाचे विश्लेषण व कार्यपुर्ती करण्यात येऊन मान्यता घेण्यात आली.

५) शै. वर्ष २०२१-२२ मध्ये संगीत प्रमाणपत्र, मुलभुत संगणक प्रमाणपत्र कोर्स, लेखन कौशल्य प्रमाण कोर्स हे नवीन प्रमाणपत्र कोर्स सुरु करण्यात आले.

६) विविध विद्याशाखा व विषय यांच्या उपयुक्तता व महत्व यासाठीचे वार्षिक पुस्तक तयार करण आले. सर्व माहिती पुस्तकास (Manual) मान्यता देण्यात आली.

७) शै. वर्ष २०२०-२१ चा AQAR तयार करुन नॅक कार्यालय, बेंगलूर कडे पाठविण्यात आला.

बैठकीच्या शेवटी प्रा.एन.एल. जाधव यांनी सर्वांचे आभार मानले व सभा संपन्न झाली.

प्राचार्य
कै.सौ.क.जा.महिला महाविद्या
परभणी

6) (3)

नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित,

कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी

## महाविद्यालय विकास समिती बैठक

## कार्यवाही अहवाल व इतिवृत्त

---

**विषय क्र.१:- मागील बैठकीचे इतिवृत्त व कार्यवाही अहवाल वाचून कायम करणे :-**

सर्व सदस्यांसमोर मा.अध्यक्षांच्या परवानगीने दि.१९ मे २०२२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व कार्यवाही अहवालाचे वाचन करण्यात आले व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

मागील बैठकीतील इतिवृत्त वाचन करुन त्यावर चर्चा होऊन मागील सर्व इतिवृत्त मान्य करण्यात आले. कार्यवाही पूर्ण झाली.

**विषय क्र.२:- शै.वर्ष २०२१-२२ चे निकाल (वर्ग व विषयनिहाय):-**

शै. वर्ष २०२१-२२ या वर्षाचा निकाल सर्व सदस्यांसमोर ठेवण्यात आला. सर्व सदस्यांनी वर्गनिहाय निकालावर समाधान व्यक्त केले. विषयास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.३:- शै.वर्ष २०२२-२३ चे अंदाजपत्रक:-**

शै. वर्ष २०२२-२३ चे अंदाजपत्रक सर्व सदस्यासमोर ठेवण्यात आले. वार्षिक उत्पन्न व खर्च (अंदाजीत) यावर सखोल चर्चा करण्यात आली. वार्षिक तुट भरुन काढण्यासाठी विशेष सूचना करण्यात येवून शै. वर्ष २०२२-२३ चा अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.४:- नवीन बांधकामाबाबत चर्चा व निर्णय:**

महाविद्यालयामध्ये नवीन नवीन अभ्यासक्रम येत असल्याने वर्ग खोल्यांची संख्या कमी पडते यासाठी बांधकाम करण्याविषयीचा प्रस्ताव मा. प्राचार्यांनी ठेवला. यावर विचार विनिमय झाला. आवश्यकतेनुसार टप्याटप्याने महाविद्यालयातील आर्थिक परिस्थीतीचा आढावा घेऊन वर्गखोल्या, खुले व्यासपीट, महिलांसाठी प्रसाधनगृहे व इतर किरकोळ दुरुस्त्या करण्याविषयीची मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.५:- शै. वर्ष २०२३-२४ करिता नविन अभ्यासक्रम सुरु करणे बाबत चर्चा व निर्णय:-**

शै.वर्ष २०२३-२४ करीता शैक्षणिक समितीने शिफारस केल्याप्रमाणे एम.ए. (गृहविज्ञान), एम.ए.(इतिहास) व एम.ए.(इंग्रजी) या विषयाचे प्रस्ताव सभागृहात चर्चेसाठी ठेवण्यात आले. त्यापैकी एम.ए. (इतिहास) व एम.ए.(गृहविज्ञान) या विषयाचे प्रस्ताव विद्यापीठाकडे मान्यतेसाठी पाठविण्याचे ठरले.

**विषय क्र.६:- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषद आयोजनाबाबत चर्चा व निर्णय:-**

शे. वर्ष २०२४-२५ मध्ये महाविद्यालयाचे पूनर्मुल्यांकन करणे आवश्यक असल्याने व त्यासाठी विविध विभागातर्फे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करणे आवश्यक असल्याने प्रस्तुत विषय सभागृहात मांडण्यात आला. त्यावर चर्चा होऊन पुढील पुनर्मुल्यांकन (NAAC) पर्यंत एक आंतरराष्ट्रीय परिषद आयोजन करण्याची मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.७:- महाविद्यालयाचे अंकेक्षक बदलणे बाबत चर्चा व निर्णय:-**

गेल्या अनेक वर्षापासुन महाविद्यालयाचे अंतर्गत लेखापरिक्षण अंकेक्षक श्री. एस.आर.गुंडलवार यांच्या कंपनीकडुन तपासणी करुन घेतली जाते. अंकेक्षकांना वयोमानानुसार महाविद्यालयास वेळ देता येत नसल्याने नवीन अंकेक्षक नेमणे विषयीचा प्रस्ताव मा.प्राचार्यांनी सभेसमोर ठेवला त्यावर चर्चा होऊन संबधितास वेळ देणेविषयी व इतर बाबींविषयी कल्पना देण्यात यावी व पुढील एक वर्षापर्यंत त्यांनाच अंतर्गत अंकेक्षक म्हणून कार्य देण्याचे सुचविले.

नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित,

कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी

# नॅक पुनर्मुल्यांकनाच्या संदर्भाने महाविद्यालय विकास समिती विशेष बैठक

## कार्यवाही अहवाल व इतिवृत्त

दि. १५.१२.२०२२

---

- **विषय क्र.१:- पाठविलेल्या AQAR चा आढावा घेणे :-**

  शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ते २०२१-२२ पर्यंत नॅक बँगलोर येथे अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्रामार्फत AQAR पाठविण्यात आले. त्याबद्दलचा पूर्ण आढावा घेण्यात आला व सर्वांनुमते झालेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

- **विषय क्र.२:- सन २०२२-२३ चा शेवटचा AQAR पाठविण्याची मान्यता मिळणे बाबत:-**

  शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाचा पाचवा AQAR पाठविण्याविषयी सविस्तर चर्चा करण्यात येवुन पाठविण्याविषयीची मान्यता देण्यात आली. कार्यवाही पुर्ण करण्यात आली.

- **विषय क्र.३:- नॅक संदर्भाने माजी विद्यार्थीनी स्नेह मेळावा आयोजनाबाबत:**

  सन २०२३-२४ मध्ये होवु घातलेल्या नॅक पुनर्मुल्यांकनाच्या संदर्भाने माजी विद्यार्थीनीचा स्नेह मेळावा या बाबत मेळाव्याचे स्वरुप व इतर बाबींवर चर्चा करण्यात येवून आयोजन करण्याविषयी मान्यता देण्यात आली.

- **विषय क्र.४:- माजी विद्यार्थीनी, पालक, शिक्षक यांच्या कडुन आलेल्या प्रतिसादाबाबत चर्चा व मान्यता:**

  नॅक मुल्यांकन प्रक्रियेमधील विद्यार्थीनी, पालक, शिक्षक व माजी विद्यार्थीनी यांचा महाविद्यालयीन शैक्षणिक सेवा-सुविधा व अभ्यासक्रम या बाबत प्रतिसाद प्राप्त झाले व सर्व प्रतिसाद संक्षिप्त रुपाने सभागृहासमोर ठेवण्यात आले. त्यावर साधक - बाधक चर्चा होवून विषय मान्य करण्यात आला.

- **विषय क्र.५:- विद्यार्थी समाधान सर्व्हेक्षण (Students Satisfactory Survey) यावर चर्चा व मान्यता :-**

  नॅक मुल्यांकन प्रक्रियेमध्ये करावे लागणारे **विद्यार्थी समाधान सर्व्हेक्षण (Students Satisfactory Survey)** या विषयी नॅक समन्वयकाने सविस्तर माहिती दिली व त्याविषयी पुर्ण कराव्या लागणा-या बाबींवर सविस्तर चर्चा झाली व विषय मान्य करण्यात आला.

220

दि. 06.05.2023

नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित,
के.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी

# महाविद्यालय विकास समिती बैठक
# कार्यवाही अहवाल व इतिवृत्त

- **विषय क्र.१:- मागील बैठकीचे इतिवृत्त व कार्यवाही अहवाल वाचून कायम करणे :-**

सर्व सदस्यांसमोर मा.अध्यक्षांच्या परवानगीने दि.१५.१२.२०२२ रोजी झालेल्या विशेष बैठकीचे इतिवृत्त व कार्यवाही अहवालाचे वाचन करण्यात आले व त्यास सर्वांनुमते मान्यता देण्यात आली.मागील बैठकीतील इतिवृत्त वाचन करुन त्यावर चर्चा होऊन मागील सर्व इतिवृत्त मान्य करण्यात आले. कार्यवाही पूर्ण झाली.

- **विषय क्र.२:- अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्रामार्फत नॅक बँगलोर येथे सादर केलेल्या अहवालाचा आढावा व चर्चा :-**

अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्रामार्फत नॅक बँगलोर येथे मागील चार AQAR पाठविले आहेत. त्याचबरोबर शेवटचा पाचव्या वर्षाचा AQAR (२०२२-२३) जुलै २०२३ पर्यंत पाठविण्याचे ठरले. त्यानंतर शै. वर्ष २०२३-२४ मध्ये नॅक पुनर्मुल्यांकन प्रक्रिया सुरु करुन पुर्णत्वास नेण्याविषयी सर्वांनुमते ठरले.

- **विषय क्र.३:- क्रीडा विभागामार्फत लॉन टेनिस बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी जिल्हा क्रीडा अधिका-याकडे मान्यतेसाठी पाठविणे बाबत चर्चा व नियोजन:-**

महाविद्यालयाच्या क्रिडा विभागामार्फत लॉन टेनिस या खेळाबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी जिल्हा क्रिडा अधिका-याकडे पाठविणे बाबतचा विषय मा. प्राचार्यांनी सभागृहात मांडला. त्यावर चर्चा होऊन लॉन टेनिस बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी जिल्हा क्रिडा अधिका-याकडे पाठविण्यात आला व कार्यवाही पुर्ण झाली.

- **विषय क्र.४:- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये येणा-या NAAC पूनर्मुल्यांकनासाठी नवीन बांधकाम, दुरुस्ती व इतर बाबींसाठी लागणा-या खर्चासाठीचे आर्थिक नियोजनावर चर्चा:**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये NAAC पूनर्मुल्यांकनासाठी माहे मार्च / एप्रिल २०२४ मध्ये समिती येणे अपेक्षित आहे. त्यानुषंगाने मागील नॅक समितीने सुचित केल्यानुसार काही नविन बांधकाम, दुरूस्त्या व नवीनिकरण व इतर बाबी पुर्ण करणे आवश्यक आहे. त्यासाठी लागणा-या खर्चासाठी निधी उभारणे बाबत चर्चा होणे आवश्यक असल्याने प्रस्तुत विषय ठेवण्यात आला असून त्यावर मा. अध्यक्षांच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र उपसमिती नेमून त्यावर उपाय योजना व नियोजन करणेविषयी ठरले. विषय मान्य करण्यात आला.

- **विषय क्र.१०:- नवीन अध्यासन केंद्र स्थापन करणे बाबत:**

नविन अध्यासन केंद्र (Study Centre) सुरु करण्याविषयीचा प्रस्ताव प्रा.डॉ.एस. जी. आवचार यांनी मांडला व त्यावर चर्चा होवून प्रस्तुत अध्यासन केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.

- **विषय क्र.११:- विद्यार्थी, पालक, शिक्षक व व्यवस्थापन मंडळ यांचे महाविद्यालयीन कार्यक्रम व कारभार या विषयी प्राप्त झालेल्या प्रतिसादावर चर्चा व मान्यता :-**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षात विद्यार्थी, पालक, शिक्षक व व्यवस्थापन मंडळ यांनी महाविद्यालयीन कार्यभार, अध्ययन, अध्यापन प्रक्रिया व विद्यार्थी मुल्यमापन प्रक्रिया यावर दिलेला प्रतिसाद प्राप्त झाला. तो संक्षिप्त स्वरुपात बैठकीत मांडण्यात आला. प्राप्त झालेल्या विधायक सुचनांवर चर्चा होवुन प्रतिसाद मान्य करण्यात आले.

- **विषय क्र.१२:- महाविद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकिय अंकेक्षण करुन घेणे बाबत** (अंतर्गत व **बहिस्थ):-**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ वित्तीय लेखे निर्धारण व शैक्षणिक, प्रशासकिय लेखे निर्धारण व प्रशासकिय अंकेक्षण सुरु करुन घेण्याबाबत सुचना प्राप्त झाल्या. आर्थिक, प्रशासकिय व शैक्षणिक अंकेक्षण (अंतर्गत व बहिस्थ) पुर्ण करण्यात आले.

- **विषय क्र.१३:-मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय:-**

**१. शुल्क क्षमापित करणे बाबत मान्यता:**

चालु शैक्षणिक वर्षात एका विद्यार्थीनीने त्यांच्या वडीलांचे बायपास सर्जरी ऑपरेशन झालेले असल्याने व एकाच कुटूंबातील तीन विद्यार्थीनी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेशित असल्याने त्यांचे एकुण शैक्षणिक शुल्कापैकी काही रक्कम प्रस्तुत कुटूंबाची आर्थिक परिस्थीती हालाखीची असल्याने क्षमापित करणेविषयी विनंती केली आहे. त्यानुसार मान्यता झाल्यास शुल्क क्षमापित करता येईल असा प्रस्ताव कार्यालयाकडुन मांडण्यात आला त्यावर चर्चा होवुन २५% ते ३०% शुल्क क्षमापित करण्यास मान्यता देण्यात आली.

**२. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या कार्याचा आढावा घेणेबाबत:-**

या विषयी चर्चा होवून मा. कोषाध्यक्ष व मा. सचिव यांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या कार्याचा आढावा घेण्यात यावा असे ठरले.

**३. महाविद्यालयाचे वसतिगृह बँक खाते क्र. ८००७५६७४३७५ मा. प्राचार्य यांच्या एकल स्वाक्षरीने सुरु ठेवणे बाबत:-**

महाविद्यालयाचे महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा जिंतुर नाका या शाखेत वसतिगृहाचे चालु बँक खाते क्र.80075674375 आहे. सदर खात्याचे व्यवहार मा. अध्यक्ष व मा. प्राचार्य यांच्या संयुक्त स्वाक्षरीने होतात.परंतु, अनेक वेळा मा. अध्यक्षांना कामानिमीत्त बाहेरगावी जावे लागते. तेंव्हा, आर्थिक व्यवहारांसाठी अडचण निर्माण होते व तात्काळ पैसे काढता येत नाहीत व विद्यापीठाच्या व इतर महाविद्यालयीन कामकाजासाठी तातडीने पैसे लागतात त्यामुळे वसतिगृह खाते हे प्राचार्यांच्या एकल स्वाक्षरीने करण्याचा प्रस्ताव श्री.चिंतलवार व्हि.डी. यांनी मांडला. त्यावर चर्चा होऊन सर्वानुमते ठराव संमत झाला.

प्राचार्य
कै.सौ.कमलताई जामकर
महिला महाविद्यालय परभणी